दिनांक २०/१०/२०२२

## प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से. श्री. ईस्माईल शमशु पठाण, वय 49 वर्षे, पद- सफाई जवान (तात्पुरते मुकादम), झोन क्रं.04 महानगरपालिका औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये.6000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | आ.लो.से.श्री. ईस्माईल शमशु पठाण, वय 49 वर्षे, पद- सफाई जवान (तात्पुरते मुकादम), झोन क्रं.04 महानगरपालिका औरंगाबाद रा. ईब्राहीमशाह कॉलनी, प्लॉटनं 03, पहाडसिंगपुरा औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 6000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 6000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या पत्नीची दोन दिवसांची गैरहजेरी सफाई निरीक्षक यांना न पाठविणसाठी व मागील हजेऱ्या लावण्याचा मोबदला म्हणून. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांची पत्नी झोन क्रं. 04 म.न.पा. औरंगाबाद येथे सफाई कामगार म्हणुन नौकरीस असून त्यांची दोन दिवसाची गैरहजेरी पडली आहे. सदर गैरहजेरी सफाई निरीक्षक यांना न पाठविण्यासाठी व मागील हजेऱ्या लावण्यासाठी आ.लो.से. ईस्माईल पठाण यांनी तक्रारदार यांना 6000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. ईस्माईल पठाण यांनी तक्रारदार यांना रुपये 6000/- लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 20/10/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे ईस्माईल पठाण यांनी पंच साक्षीदारा समक्ष ठरलेली लाचेची रक्कम रुपये 6000/- साईबाबा मंदिर जवळ, विश्वासनगर,लेबर कॉलनी जवळ औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सिटीचौक येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोना/साईनाथ तोडकर पोअं/विलास चव्हाण, केवलसिंग घुसिंगे, चालक- चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

20/10/22

**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**